महाज्योती
ज्ञानदीप समतेचा

**महाराष्ट्र शासन**

**इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई**

**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022**

**दुरध्वनी क्रं.** 0712-2959381 CIN: U85300PN2019NPL187405 **ई मेल** mahajyotingp@gmail.com

**जा.क्र.** महाज्योती, नागपूर/आस्था/2661/2023-24, **दिनांक** :-06/12/2023

**-:परिपत्रक:-**

**विषय :- UPSC दिल्ली व पुणे येथील अनुक्रमे इंग्रजी व मराठी माध्यमाच्या प्रशिक्षणासाठी प्रसिध्द केलेली निवड यादी रद्द करून विद्यार्थ्यांना प्रशिक्षण केंद्रांची निवड करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत.**

UPSC दिल्ली व पुणे येथील अनुक्रमे इंग्रजी व मराठी माध्यमाच्या प्रशिक्षणासाठी घेण्यात आलेल्या चाळणी परीक्षेचा निकाल दि.28/11/2023 रोजी घोषित करण्यात आलेला आहे व दि.04/12/2023 रोजी UPSC दिल्ली व पुणे येथील अनुक्रमे इंग्रजी व मराठी माध्यमाच्या प्रशिक्षणासाठी निवड यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तसेच या प्रशिक्षणाकरीता खालील प्रमाणे तीन संस्था उपलब्ध आहेत. संस्थांना प्रशिक्षण द्यावयाच्या विद्यार्थ्यांची संख्या संस्थेसमोर नमूद केलेली आहे.त्याचा तपशील खालीलप्रमाणे:-

| अ.क्र | प्रशिक्षण संस्थेचे नाव | ठिकाण | माध्यम | प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीराम आय. ए. एस. अकादमी, नवी दिल्ली येथील प्रशिक्षण केंद्र | श्रीराम आय ए एस टॉवर, 10-B, पुसा रोड, बडा बाजार मार्ग, ओल्ड राजेंद्र नगर, निअर कारोल बाग मेट्रो स्टेशन, पिल्लर नं. (112) न्यु दिल्ली - 110060. | इंग्रजी | 1000 |
| 2 | ज्ञानदीप ॲकडमी, पुणे | TCG स्क्वेअर बिल्डींग, अल्का टॉकीज समोर, अल्का टॉकीज चौक, टिळक रोड, सदाशिव पेठ, पुणे - 411030 | मराठी | 375 |
| 3 | युनिक ॲकडमी, पुणे येथील प्रशिक्षण केंद्र | युपीएससी कॅम्पस, अक्षरनंदन शाळे जवळ, J W Marriott हॉटेलच्या मागे, सेनापती बापट रोड, बहिरटवाडी, गोखलेनगर, पुणे - 411016 | मराठी | 375 |
| | | | **एकूण जागा** | 1750 |

या अनुषंगाने विद्यार्थ्यांना संस्था निवडीचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला होता. तथापि आता विद्यार्थ्यांच्या अशा तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत की, उमेदवारांनी ज्या प्रशिक्षण संस्थेस प्राध्यान्य दिलेला होता त्या संस्थेकरीता त्यांची निवड झालेली नाही. या अनुषंगाने प्राप्त तक्रारींचा विचार करता महाज्योतीने UPSC दिल्ली व पुणे येथील अनुक्रमे इंग्रजी व मराठी माध्यमाच्या प्रशिक्षणासाठी प्रसिध्द केलेली निवड यादी रद्द करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्याअनुषंगाने महाज्योतीने दि.04/12/2023 रोजीचे परिपत्रक क्र. महाज्योती,नागपूर/आस्था/2631/2023-24 व महाज्योती, नागपूर /आस्था/2636/ 2023-24 हे रद्द करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना प्रशिक्षण संस्था निवडण्याची संधी पुन्हा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी सद्यस्थितीत कोणत्याही प्रशिक्षण संस्थेत प्रवेश घेऊ नये.

विद्यार्थ्यांना संस्था निवडीची लिंक www.mahajyoti.org.in या संकेतस्थळावरील नोटीस बोर्डमध्ये दि.06/12/2023 रोजी पासुन दि.08/12/2023 पर्यंत पुन्हा संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. या परीक्षेला हजर राहिलेल्या सर्व उमेदवारांना प्रशिक्षण संस्था निवडण्याकरीता लिंकच्या द्वारे उपलब्ध करून देण्यात येत आहे.

1) UPSC प्रशिक्षणाकरीता पुणे येथे मराठी माध्यमाच्या एकूण 750 जागा आहेत.
2) UPSC प्रशिक्षणाकरीता दिल्ली येथे इंग्रजी माध्यमाच्या एकूण 1000 जागा आहेत.
3) ज्या विद्यार्थ्यांना मराठी माध्यमामधून प्रशिक्षण हवे आहे, त्यांनी पुणे येथील प्रशिक्षण केंद्रांची निवड करावी.
4) ज्या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाचे केंद्र हवे आहे त्या विद्यार्थ्यांनी दिल्ली येथील प्रशिक्षण केंद्राची निवड करावी.
5) ज्या विद्यार्थ्यांना दोन्ही पैकी मराठी किंवा इंग्रजी भाषेतील प्रशिक्षण हवे आहे असे विद्यार्थी पुणे किंवा दिल्ली अशा दोन्ही ठिकाणाच्या प्रशिक्षण केंद्रांची निवड करू शकतात.
6) विद्यार्थ्याने प्रशिक्षण केंद्रांना जर पसंती क्रम दिला नाही तर अशा विद्यार्थ्यांची प्रशिक्षणासाठी निवड यादी तयार करताना विचार केला जाणार नाही.
7) ज्या विद्यार्थ्यांनी जेंडर निवडताना चूक केलेली आहे अशा विद्यार्थ्यांना जेंडरमध्ये दुरुस्ती करण्याची सुविधा उपरोक्त नमुद लिंक द्वारे करून देण्यात येत आहे.
8) ज्या विद्यार्थ्यांनी स्वत:चा जाती प्रवर्ग निवडलेला नाही किंवा नमूद केलेला नाही किंवा चुकीचा नमुद केलेला आहे. अशा विद्यार्थ्यांना प्रवर्ग दुरुस्त करण्याची सुविधा उपरोक्त नमुद लिंक द्वारे करून देण्यात येत आहे.
9) विद्यार्थी दिव्यांग असल्यास आणि विद्यार्थ्यांने दिव्यांगाचा प्रकार नमूद केला नसल्यास तो नमूद करण्याची सुविधाही यासह उपलब्ध करून देण्यात येत आहे.
10) विद्यार्थी अनाथ असल्यास संस्थात्मक किंवा संस्थाबाह्य अशी नोंद करण्याचा पर्याय देखील यासह उपलब्ध करून देण्यात येत आहे.
11) काही विद्यार्थ्यांनी पोलीस भरती प्रशिक्षण 2021 करीता आमची फक्त निवड झाली होती. परंतु आम्ही प्रत्यक्षात लाभ घेतला नव्हता, त्यामुळे आमचे आम्हाला दुबार लाभार्थी समजण्यात येऊ नये. अशी मागणी महाज्योतीकडे केली होती. अशा विद्यार्थ्यांबाबत वस्तुस्थिती तपासून सकारात्मक निर्णय घेण्यात येत आहे. अशा विद्यार्थ्यांनी देखील प्रशिक्षण संस्था निवडण्याकरीता आपला पर्याय नोंदवावा.

विद्यार्थ्याला प्राप्त गुण तसेच त्याने दिलेला पसंती क्रम तसेच उपलब्ध असलेल्या जागा या बाबी विचारात घेऊन पुणे येथील प्रशिक्षण केंद्रातील 750 विद्यार्थ्यांची निवड करण्यात येईल.आणि दिल्ली येथील प्रशिक्षणाकरीता 1000 विद्यार्थ्यांचे निवड करण्यात येईल.

**दि.04.12.2023 रोजी युपीएससी दिल्ली व पुणे येथील प्रशिक्षणासाठी प्रसिद्ध केलेली निवड यादी याद्वारे रद्द करण्यात येत आहे.**

**सर्व विद्यार्थ्यांना संस्था निवडीचा पर्याय प्रथमत: उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण संस्थेकरीता आपला पसंती क्रम नव्याने नोंदविणे गरजेचे आहे. यापुर्वी दिलेले कोणतेही पसंती क्रम विचारात घेतले जाणार नाही याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**

**या बाबत UPSC दिल्ली व पुणे येथील अनुक्रमे इंग्रजी व मराठी माध्यमाच्या प्रशिक्षणासाठी स्वतंत्रपणे निवड याद्या प्रसिध्द करण्यात येतील. याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**

स्वा

(राजेश खवले)

व्यवस्थापकीय संचालक

महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था

(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर